संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
12 SEP 2025
प्राप्त झाले सही....................

2099
17.09.2025

**संचालनालय, लेखा व कोषागारे व अधिनस्त कार्यालयातील अस्थायी पदांना मुदतवाढ देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्र.सेवाप्र-२०२५/प्र.क्र.३५/कोषा प्रशा-३**
**हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : ११ सप्टेंबर, २०२५**

प्रशा कोषा

**वाचा:-**

१) वित्त विभाग शासन निर्णय क्र.सेवाप्र-२०१९/प्र.क्र.१९४/कोषा प्रशा-३, दि.१५.१२.२०२१
२) वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेवाप्र-२०२२/प्र.क्र.१२४/कोषा प्रशा-३, दि.०२.०९.२०२४
३) वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेवाप्र-२०२५/प्र.क्र.३५/कोषा प्रशा-३, दि.१२.०३.२०२५.
४) वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेवाप्र-२०२४/प्र.क्र.१३६/कोषा प्रशा-३, दि.२०.०६.२०२५
५) संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे पत्र क्र.संलेको-२०२५/प्रशा.कोषा/कार्या-१/ प्र.क्र.१४३५ अ/अस्थायी पदे/मुदतवाढ/२०२५-२६/७६१/३४९२,दि.११.०८.२०२५
६) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.,दि.२६.०९.२०२५

**शासन निर्णय**

वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये लेखा व कोषागारे संचालनालय व त्यांच्या अधिनस्त कार्यालयासाठी सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आला असून वित्त विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर अधिनस्त कोषागार कार्यालय, नागपूर कार्यालयात अप्पर कोषागार अधिकारी (लेखा अधिकारी संवर्ग) या संवर्गाचे १ नवीन पद मंजूर करण्यात आले आहे. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२३.०४.२०२५ अन्वये केंद्र शासन पुरस्कृत योजना (SNA SPARSH) प्रणालीमधून राबविण्यासाठी "महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार (MAHARASHTRA STATE CYBER TREASURY)" कार्यालयाची निर्मिती करण्यात आलेली असून संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयान्वये सदर कार्यालयासाठी २७ नवीन पदांची निर्मिती करण्यात आली आहे. वित्त विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक ५ येथील शासन निर्णयान्वये संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील अस्थायी पदांना दि.०१.०३.२०२५ ते दि.३१.०८.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर अस्थायी पदांना दिलेली मुदतवाढ संपुष्टात आली असल्याने आता सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्यात आलेल्या एकूण १७०६ अस्थायी पदांना दि.०१.०९.२०२५ ते दि.२८.०२.२०२६ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

125

श्रीम. स्नेहलता
17.09.2025

01/35/2025/1626
16.09.2025

यासाठी होणारा खर्च संबंधित लेखाशिर्षांखालील आर्थिक वर्ष सन २०२५-२०२६ या वित्तीय वर्षातील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

हे आदेश वित्त विभाग शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२६.०९.२०२५ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(ता.र.पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**सहपत्र: परिशिष्ट-अ**

प्रत,

*१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)- १. महाराष्ट्र, मुंबई (पाच प्रती)
*२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)- २. महाराष्ट्र, नागपूर (पाच प्रती)
३. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
*४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
*५. सर्व विभागीय सह/उप संचालक, लेखा व कोषागारे
*६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
*७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
*८. सर्व कोषागार अधिकारी/सर्व उपकोषागार अधिकारी
९. कक्ष अधिकारी, प्रशासन ४, अर्थसंकल्प ७, आ.पु.क., वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. निवडनस्ती कोषा प्र-३.

(* संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)

परिशिष्ट-अ

**लेखा व कोषागारे संचालनालय व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील दि.०१.०९.२०२५ ते दि.२८.०२.२०२६ पर्यंत मुदतवाढ मिळणेसाठीची अस्थायी पदे दर्शविणारे एकत्रित गोषवारा विवरणपत्र**

| अ.क्र. | संवर्ग | पदनाम | सुधारित आकृतीबंधानुसार मंजूर पदसंख्या (नियमित, नवीन पदसंख्या) |
|---|---|---|---|
| १ | अ | सह संचालक/ अधिदान व लेखा अधिकारी | ०९ |
| २ | अ | उपसंचालक/ कोषागार अधिकारी (संवर्ग उपसंचालक)/उप अधिदान व लेखा अधिकारी | ४८ |
| ३ | अ | सहायक संचालक/कोषागार अधिकारी/सहायक अधिदान व लेखा अधिकारी | ७५ |
| ४ | ब-राप | लेखा अधिकारी/अप्पर कोषागार अधिकारी | १८६ |
| ५ | ब-राप | स्वीय सहाय्यक | ०१ |
| ६ | ब-राप | सहायक लेखा अधिकारी/ उपकोषागार अधिकारी (उच्चश्रेणी) | ३०८ |
| ७ | ब-अराप | लघुलेखक (उच्चश्रेणी) | ०२ |
| ८ | ब-अराप | लघुलेखक (निम्नश्रेणी) | ०३ |
| ९ | क | वरिष्ठ लेखापाल | १५० |
| १० | क | कनिष्ठ लेखापाल | ६३८ |
| ११ | क | लघुटंकलेखक | ०३ |
| १२ | क | दूरध्वनीचालक | ०२ |
| १३ | क | लिपिक टंकलेखक (लेखा लिपीक) | १७० |
| १४ | क | वाहनचालक | ०२ |
| १५ | ड | दप्तरी | ३२ |
| १६ | ड | नाईक | १८ |
| १७ | ड | उद्वाहन चालक | ०३ |
| १८ | ड | सहायक बांधणीकार (मृत संवर्ग) | ०१ |
| १९ | ड | शिपाई | ५२ |
| २० | ड | पहारेकरी (मृत संवर्ग) | ०२ |
| २१ | ड | सफाईगार (मृत संवर्ग) | ०१ |
| | | **एकूण पदे** | **१७०६** |